मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३०५ वा ● मंगळवार, ता. १३ मे २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००




## किंग कोहलीची कसोटीमधून एक्झिट

**मुंबई । प्रतिनिधी**

भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मानंतर विराट कोहलीने कसोटी क्रिकेटमधून तडकाफडकी निवृत्ती जाहीर केली आहे. विराट कोहलीने सोशल मिडीया अकाउंटवर पोस्ट करत यासंदर्भातील माहिती दिली आहे. भारतीय क्रिकेटचा 'किंग' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विराटची निवृत्ती ही भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी एका आठवड्यातील दुसरा मोठा धक्का आहे. कसोटी क्रिकेटला अलविदा करत फक्त एकदिवसीय क्रिकेट खेळण्याचा निर्णय कोहलीने घेतला आहे. कोहलीने १२३ कसोटी सामन्यांत ३० शतके व ३१ अर्धशतके झळकावत ९२३० धावा केल्या आहेत. त्याच्या नेतृत्वात भारताने ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच भूमीवर हरवले होते आणि टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीतही पोहोचला होता.


मात्र त्याने घेतलेल्या या तडकाफडकी निर्णयाने क्रिकेट चाहत्यांना आणखी एक मोठा धक्का दिला आहे. विराटने आपल्या निवृत्तीबाबत माहिती देताना असे म्हटले आहे की, १४ वर्षांपूर्वी मी कसोटी क्रिकेटमध्ये पहिल्यांदा बॅगी ब्लू रंगाचा पोशाख घातला होता. खरं सांगायचं तर, या फॉरमॅटमध्ये मला असा प्रवास करावा लागेल याची मी कधीच कल्पना केली नव्हती. या फॉरमॅटने माझी परीक्षा घेतली, मला घडवले आणि आयुष्यभर उपयोगी येतील असे धडे शिकवले. कसोटी फॉरमॅटमध्ये खेळण्यात वैयक्तिक गुणांची कसोटी लागते. या फॉरमॅटमध्ये स्वतःला शांत ठेवून कसे खेळायचे हे मी शिकलो, पाच दिवसांच्या खेळात प्रत्येक दिवस आपली परीक्षा घेतो. रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर विराट कोहलीनेही कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र,येत्या जून महिन्यात भारतीय संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. हा दौरा पाहता बीसीसीआयने त्याला आपल्या निर्णयावर फेरविचार करण्याची विनंती केली होती. मात्र, विराट आपल्या निर्णयावर ठाम राहिला. अखेर आज त्याने १४ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीला पूर्णविराम दिला आहे. विराटच्या निवृत्तीनंतर अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# ऑपरेशन सिंदूर ही केवळ लष्करी कारवाई नव्हती, तर ती भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचे प्रतीक- राजनाथ सिंह

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

ऑपरेशन सिंदूर ही केवळ लष्करी कारवाई नव्हती, तर ती भारताच्या राजकीय, सामाजिक आणि धोरणात्मक इच्छाशक्तीचे प्रतीक होती असे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटले आहे. राजनाथ सिंह यांनी ११ मे रोजी उत्तर प्रदेशातील लखनऊ इथे ब्रह्मोस एकात्मिकीकरण आणि चाचणी सुविधा केंद्राचे आभासी पद्धतीने उद्घाटन केले त्यावेळी ते बोलत होते. ही कारवाई म्हणजे दहशतवादाविरोधातील भारताच्या कणखर इच्छाशक्तीचे तसेच, भारताच्या भूमीवर भारत विरोधी घटक तसेच दहशतवादी संघटनांमुळे आपल्या प्रियजनांना गमावलेल्या निष्पाप कुटुंबांना न्याय मिळेल याची सुनिश्चिती करणाऱ्या, सशस्त्र दलांची क्षमता आणि निर्धाराची प्रचिती देणारी कारवाई होती अशा शब्दांत राजनाथ सिंह यांनी या कारवाईचे वर्णन केले. ऑपरेशन सिंदूरला हे, भारत जेव्हा जेव्हा दहशतवादाविरोधात कारवाई करतो, तेव्हा दहशतवादी आणि त्यांच्या म्होरक्यांसाठी सीमेपलीकडील भूमी देखील सुरक्षित ठिकाण नसते याचाच पुरावा असल्याचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले. उरी इथल्या घटनेनंतरचा सर्जिकल स्ट्राईक, पुलवामा हल्ल्यानंतरचे हवाई हल्ले आणि आता पहलगाम हल्ल्यानंतरच्या अनेक हल्ल्यांमधून, भारताच्या भूमीवर दहशतवादी हल्ले झाल्यास भारत काय करू शकतो याचे दर्शन अवघ्या जगाला झाले असल्याचे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दहशतवादाविरोधात शून्य सहनशीलतेच्या धोरणाचा अवलंब करत, आजचा नवा भारत सीमेच्या दोन्ही बाजूंनी होणाऱ्या दहशतवादाविरोधात प्रभावी कारवाई करेल ही बाब स्पष्ट केली आहे असे त्यांनी सांगितले. ही कारवाई केवळ पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी पायाभूत सुविधा नष्ट करण्यासाठीच राबवली गेली, या कारवाईत निष्पाप नागरिकांना लक्ष्य करण्यात आले नव्हते ही बाबही त्यांनी ठळकपणे अधोरेखित केली. तरी देखील पाकिस्तानने मात्र भारतातील नागरी भागांना लक्ष्य केले आणि मंदिरे, गुरुद्वारा तसेच चर्चवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला असे ते म्हणाले. आपल्या सशस्त्र दलांनी शौर्य आणि संयमाचे दर्शन घडवत पाकिस्तानच्या अनेक लष्करी तळांवर हल्ला करून सडेतोड उत्तर दिले असे ते म्हणाले. आपण केवळ सीमेजवळच्याच लष्करी तळांवर कारवाई केली नाही, तर आपल्या सशस्त्र दलांचा धडाका पाकिस्तानी लष्कराचे मुख्यालय असलेल्या रावळपिंडीपर्यंत पोहोचला असे ते म्हणाले. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ब्रह्मोस एकात्मिकरण आणि चाचणी सुविधा केंद्राविषयी देखील माहिती दिली. हे केंद्र संरक्षण क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या भारताच्या प्रयत्नांना बळकटी देईल आणि मोठ्या प्रमाणात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करून या प्रदेशाच्या सामाजिक - आर्थिक विकासातही योगदान देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय तंत्रज्ञान दिनीच होत असलेल हे उद्घाटन म्हणजे एक ऐतिहासिक क्षण आहे, यातून भारताच्या वाढत्या नवोन्मेषी उर्जेचे प्रतिबिंब उमटले आहे

तसेच ही घडमोड अतिमहत्त्वाच्या, अत्याधुनिक आणि आघाडीच्या तंत्रज्ञानात वेगाने होत असलेल्या जागतिक बदलांशी सुसंगत घडमोड असल्याचे ते म्हणाले. ब्रह्मोसला म्हणजे केवळ जगातील सर्वात वेगवान सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांपैकी एक नाही, तर ते भारतीय सशस्त्र दलांच्या सामर्थ्याचा संदेश आहे, तो शत्रूंना रोखणारा संदेश आहे तसेच देशाच्या सीमांचे रक्षण करण्याच्या अतूट वचनबद्धतेचा संदेश आहे असे ते म्हणाले. ब्रह्मोस म्हणजे भारत आणि रशियाच्या उच्च संरक्षण तंत्रज्ञानाचा मिलाफ असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. जोपर्यंत भारत जगासमोर उभा राहणार नाही, तोपर्यंत कोणीही आपला आदर करणार नाही. या जगात भीतीला कोणतेही स्थान नाही, केवळ सामर्थ्यच सामर्थ्याचा आदर करते असे भारताचे क्षेपणास्त्र पुरुष अर्थात आणि माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांनी म्हटले असल्याचा दाखला त्यांनी दिला. आणि आज भारत जगातील सर्वात शक्तिशाली राष्ट्रांपैकी एक आहे आणि हे केंद्र भारताची ताकद आणखी वाढवण्यात मदतीचे ठरेल असे त्यांनी सांगितले. हे सुविधा केंद्र उत्तर प्रदेश संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर साठी अभिमानाची बाब असल्याचेही राजनाथ सिंह म्हणाले. या केंद्राच्या माध्यमातून या पूर्वीच सुमारे ५०० प्रत्यक्ष आणि १,००० अप्रत्यक्ष रोजगार निर्माण झाले आहेत, यातून संरक्षण उत्पादन केंद्र म्हणून राज्याची वाढत्या स्थानाची प्रचिती येते असे ते म्हणाले. राज्याला (उत्तर प्रदेश) जगातील सर्वोच्च संरक्षण उत्पादन आणि निर्यात केंद्र म्हणून विकसित करण्याचे केंद्र सरकारचे ध्येय आहे, त्याला अनुसरूनच ध्येयावर आधारित आहे, या कॉरिडॉरची स्थापना करावी असा दृष्टीकोन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने बाळगला ही बाबही राजनाथ सिंह यांनी ठळकपणे अधोरेखित केली. उत्तर प्रदेश संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर अंतर्गत आतापर्यंत ३४,००० कोटी रुपयांच्या प्रस्तावित गुंतवणुकीसह एकूण १८० सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या आहेत, तसेच ४,००० कोटी रुपयांची गुंतवणूकही या पूर्वीच झाली असल्याची माहिती त्यांनी दिली. विमान उत्पादन, यूएव्ही, ड्रोन, दारुगोळा, मिश्रीत आणि अतिमहत्वाचे घटक, लहान शस्त्रास्त्रे,



वस्त्रोद्योग आणि पॅराशूट या क्षेत्रात मोठी गुंतवणूक आली असल्याचे त्यांनी सांगितले. या गुंतवणुकीत सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही क्षेत्रांचा सहभाग असल्याची बाबही त्यांनी ठळकपणे अधोरेखित केली. त्याअंतर्गत लखनऊमध्येच, पीटीसी इंडस्ट्रीज लिमिटेडद्वारे टायटॅनियम आणि सुपर अलॉय मटेरियल प्रकल्प सुरू केले जात आहेत. याशिवाय अतिरिक्त सात महत्त्वाच्या प्रकल्पांचीही पायाभरणी केली जात आहे. यामुळे संरक्षण क्षेत्रात आत्मनिर्भरता साध्य करण्याच्या भारताच्या प्रयत्नांना गती मिळू शकेल असे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह म्हणाले. यावेळी राजनाथ सिंह यांनी मेक-इन-इंडिया, मेक-फॉर-द-वर्ल्ड हा केंद्र सरकारचा दृष्टीकोनही पुन्हा अधोरेखित केला. आत्मनिर्भरतेचा अर्थ केवळ भारताच्या स्वतःच्या सुरक्षा गरजा पूर्ण करण्यासाठी निर्मिती करण्यापुरता मर्यादीत नाही, तर त्याबरोबरीनेच देशाला जागतिक बाजारपेठेत संरक्षण उपकरणांचा प्रमुख निर्यातदार देश बनवणे असा याचा अर्थ असल्याचे त्यांनी ठामपणे नमूद केले. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या अलीकडील अहवालाचा संदर्भ देत त्यांनी २०२४ मध्ये जागतिक लष्करी खर्च २,७१८ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढला असल्याचे सांगितले. इतकी मोठी बाजारपेठ म्हणजे एक संधी असून भारताने ती साधली पाहिजे असे ते म्हणाले. ब्रह्मोस सुविधा केंद्राचे उद्घाटन हे भारताला जागतिक संरक्षण उत्पादन परिसंस्थेतील एक महत्त्वाचा देश बनवण्याच्या दिशेने टाकलेले ठोस पाऊल असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखालील उत्तर प्रदेश सरकार, संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात डीआरडीओचे शास्त्रज्ञ, अभियंते आणि इतर भागधारकांनी केवळ ४० महिन्यांच्या आत प्रकल्प पूर्ण केल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी त्यांच्या प्रयत्नांची प्रशंसा केली. सध्याची परिस्थितीत, आपण कार्यक्षमतेने आणि कालबद्ध रितीने आपली ध्येये साध्य करणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. विकास विषयक एक मजबूत परिसंस्था तयार केल्याबद्दल तसेच उत्तर प्रदेश संरक्षण औद्योगिक कॉरिडॉरची स्थापना, लखनऊमधील डीआरडीओचे संरक्षण तंत्रज्ञान आणि चाचणी केंद्र स्थापना आणि २०२० मध्ये संरक्षणविषयक प्रदर्शनाचे आयोजन अशा उपक्रमांची अंमलबजावणी हे इथल्या राज्य सरकारचे श्रेय असल्याचे म्हणत त्यांनी राज्य सरकारचे कौतुकही केले. या कार्यक्रमाच्या उद्घाटनस्थळावरून उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या संबोधनातून त्यांनी लखनऊला संरक्षण उत्पादन केंद्र बनवण्याचे ध्येय पुढे नेल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचे आभार मानले. लखनऊमधील हे सुविधा केंद्र मेक-इन-इंडिया उपक्रम, आत्मनिर्भरता आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रातील गुंतवणुकीला चालना देईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.यावेळी योगी आदित्यनाथ यांनी संरक्षण विषयक उत्पादनाला चालना देण्यासाठी राज्य सरकार राबवत असलेल्या उपक्रमांचीही माहिती दिली. उत्तर प्रदेश संरक्षण औद्योगिक कॉरिडॉर सर्व सहा केंद्राअंतर्गत वेगाने कामे सुरू आहेत असे त्यांनी सांगितले. संरक्षण उत्पादन क्षेत्राअंतर्गत राज्यात स्थापन होत असलेल्या सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रातल्या उद्योगांसह, विविध प्रकल्पांची माहितीही योगी आदित्यनाथ यांनी दिली. ऑपरेशन सिंदूरने अवघ्या जगाला आता भारत दहशतवाद सहन करणार नाही असा स्पष्ट संदेश दिला, अशा शब्दांत त्यांनी या कारवाईचे महत्व अधोरेखित केले. आता दहशतवादाचे समूळ उच्चाटन करण्याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही, असे ते म्हणाले. लखनऊमधील ब्रह्मोस एकात्मिकरण आणि चाचणी सुविधा केंद्र एकूण २०० एकर क्षेत्रात विस्तारले आहे. या केंद्रात बूस्टर उप-असेंब्ली, एव्हियोनिक्स, प्रोपेलंट, रामजेट इंजिनचे एकात्मिकरण घडवून आणले जाईल. या केंद्राच्या संकुलाच्या संरचनेत डिझाइन आणि प्रशासकीय इमारतीसह उपक्रम केंद्राचीही नियोजनात्मक आखणी केली गेली आहे. या संकुलाच्या उभारणीसाठी अंदाजे ३०० कोटी रुपयांचा खर्च आला आहे. या संकुलामुळे दीर्घकालीन परिप्रेक्षात संरक्षण उद्योग क्षेत्र आणि संबंधित उद्योजकांसाठी कौशल्य विकासाचा मार्ग प्रशस्तर होणार आहे. या संकुलाला पाठबळ देण्याच्या उद्देशाने संकुलाच्या आसपास सहाय्यक आणि सब - असेंब्लीची संपूर्ण संरक्षण विषयक परिसंस्था विकसित केली जाणार आहे. हे केंद्र भारतीय तंत्रज्ञान संस्थेचे विद्यार्थी, पर्यवेक्षक, अभियंत्यांना तसेच विद्यार्थ्यांच्या औद्योगिकीकरणाची प्रक्रिया आणि कौशल्य विकासात मोठ्या प्रमाणात मदतीचे ठरणार आहे. यामुळे लोकांना नोकरीच्या संधी शोधण्यासाठी स्थलांतर करण्याची गरज उरणार नाही याचीही सुनिश्चिती केली जाणार आहे. ब्रह्मोस एरोस्पेसने या सुविधा केंद्राच्या कार्यान्वयनासाठी ३६ प्रशिक्षणार्थींची निवड केली आहे. नव्याने निवड झालेल्या या प्रशिक्षणार्थींपैकी पाच जणांचा मुख्यमंत्री उत्तर प्रदेश यांच्या हस्ते उद्घाटनाच्या कार्याक्रमाचा भाग म्हणून सत्कारही केला. उत्तर प्रदेशाचे उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि ब्रिजेश पाठक, मुख्य सचिव मनोज कुमार सिंह, संरक्षण संशोधन आणि विकास विभागाचे सचिव तचेस डीआरडीओ अध्यक्ष डॉ. समीर व्ही कामत, ब्रह्मोसचे महासंचालक डॉ. जयतीर्थ आर जोशी, लोकप्रतिनिधी आणि केंद्र तसेच राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

## दहावीचा निकाल आज

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर मंगळवार दि. १३ मे, २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत असल्याचे मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. यासाठी अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते पुढीलप्रमाणे आहेत. https://results.digilocker.gov.in, https://sscresult.mahahsscboard.in, http://sscresult.mkcl.org, https://results.targetpublications.org, https://results.navneet.com, https://www.tv9hindi.com/education/, board-exams/maharashtra-board-exams, https://education.indianexpress.com/, boards-exam/maharashtra-ssc-10-results, https://www.indiatoday.in/education-today/results, https://www.aajtak.in/education/board-exam-results.

## जिद्द, चिकाटी आणि कष्टातून रुकसाना झाली पुणे कारागृह पोलिस

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

मनातील इच्छाशक्ती, जिद्द, चिकाटी आणि परिश्रम करण्याची तयारी असल्यास शिखर गाठता येते याचे ताजे उदाहरण म्हणजे गुंडेगाव येथील रुकसाना अशीर सय्यद हिची पुणे कारागृह पोलीसपदी निवड झाली आहे. रुकसाना ही नगर तालुक्यातील गुंडेगाव या छोट्याश्या गावात राहणारी सर्वसाधारण कुटुंबातील मुलगी, वडील खेड्या-पाड्यात जाऊन कुल्फीचा व्यवसाय करतात तर मोठे चूलते शकील सय्यद आणि छोटे चूलते समीर सय्यद या दोन्ही चुलत्याचे तीला वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले.



दिड वर्षापुर्वी रुकसाना चा इनामगाव येथील पिरजादे कुटुंबात विवाह झाला. पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगलेल्या रुकसानाला पती आणि सासू-सासऱ्यांनी पाठबळ दिले. विशेष म्हणजे यापूर्वी झालेल्या पोलीस भरतीत काही गुणानी तिची संधी हुकली होती. मात्र नुकत्याच झालेल्या कारागृह पोलीस परीक्षेत तिने यश मिळवत पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न साकारले आहे. पुणे कारागृह येरवडा, पोलीस कर्मचारीपदी निवड झाली असली तरी स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी व्हायचे स्वप्न असल्याचे रुकसाना ने बोलून दाखवले. रुकसाना हिची पुणे कारागृह पोलीसपदी निवड झाल्याबद्दल गुंडेगाव व इनामगाव ग्रा.पं. सरपंच, उपसरपंच ग्रामस्थ आदींनी तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा देत अभिनंदन केले.

## स्वराज्यातील किल्ले पराक्रमाची शौर्यस्थळे आहेत- तापकीर

### वासंतिक व्याख्यानमाला २०२५ - अंतिम पुष्प

पिंपरी (ता. : १२ मे २०२५) स्वराज्यातील किल्ले आपल्या पराक्रमाची शौर्यस्थळे आहेत! असे प्रतिपादन दुर्ग अभ्यासक संदीप तापकीर यांनी विरंगुळा केंद्र, पागेच्या तालमीसमोर, चिंचवडगाव येथे रविवार, दिनांक ११ मे २०२५ रोजी केले. ज्येष्ठ नागरिक संघ, चिंचवड आयोजित तीन दिवसीय वासंतिक व्याख्यानमालेत शिवरायांचे सुहृद गडकिल्ले या विषयावरील अंतिम पुष्प गंफताना संदीप तापकीर बोलत होते. गिर्यारोहक नीलेश गावडे, सामाजिक कार्यकर्ते राजाभाऊ गोलांडे, ज्येष्ठ नागरिक संघ - चिंचवडचे अध्यक्ष रमेश इनामदार, अंतर्गत हिशेब तपासणीस गोपाळ भसे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. शंखध्वनीच्या पार्श्वभूमीवर दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि त्रिवार ओंकाराने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. रमेश




इनामदार यांनी प्रास्ताविकातून, शिवरायांच्या पस्तीस वर्षांच्या कारकिर्दीचा निवडक इतिहास आपल्याला ज्ञात असतो; परंतु त्यांच्या देदीप्यमान इतिहासाची साक्ष गडकिल्ले देत आहेत! असे विचार मांडले. नीलेश गावडे यांनी, इतिहास डोळसपणे अभ्यासला पाहिजे! असे मत व्यक्त केले. संदीप तापकीर पुढे म्हणाले की, आपल्या राज्याचे महाराष्ट्र हे नाव किल्ल्यांनी सार्थ ठरवले आहे. महाराष्ट्रातील किल्ले आणि इतर राज्यातील किल्ले यांत मूलभूत फरक आहे. छत्रपती शिवाजीमहाराज यांच्या कारकिर्दीपूर्वीही किल्ले अस्तित्वात होते. इसवीसन पूर्व २२० पासून किल्ले बांधण्यात आले आहेत. समर्थ रामदासस्वामी यांनी शिवाजीमहाराजांना गडपती असे संबोधले आहे; कारण जन्मापासून मृत्युपर्यंत त्यांची अवघी कारकीर्द किल्ल्यांभोवती व्यतीत झालेली आहे. गिरीदुर्ग आणि जलदुर्ग या प्रकारात महाराजांनी पंचवीस किल्ले बांधले. त्यांची दुर्गबांधणी वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यात त्यांनी दुर्गशास्त्राचे अनेक प्रयोग केले आहेत. अठरापगड जातीचे किल्लेदार त्यांनी नेमले. किल्ल्यांच्या माध्यमातून हजारो मावळ्यांना संघटित केले. राजगड आणि रायगड यांचे त्यांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान होते. १६४५ ते १६७२ या काळात त्यांचे राजगडावर वास्तव्य होते. पुढील काळात किल्लेविषयक एका जागतिक प्रदर्शनात रायगडाच्या प्रतिकृतीला जगातील सर्वोत्कृष्ट किल्ल्याचा बहुमान प्राप्त झाला होता. शिवरायांनी ज्या ज्या किल्ल्यांवर विजय मिळविला, त्या त्या विजयासोबत काही दुःखद घटनाही त्यांच्या वाट्याला आल्या. स्वराज्याला वर्धिष्णू करताना महाराजांनी किल्ल्यांचा अत्यंत चतुराईने वापर केला. पुरंदरच्या तहात त्यांना स्वराज्यातील २३ किल्ले मिर्झाराजे जयसिंग यांना द्यावे लागले. हा त्यांच्या जीवनातील अतिशय खडतर काळ होता. पुढे तीन वर्षांच्या कालावधीत त्यांनी स्वराज्यासाठी अडीचशे किल्ले पादाक्रांत केले. १६७३ मध्ये त्यांनी रायगड हा किल्ला राजधानीसाठी निवडला. ०६ जून १६७४ रोजी येथेच त्यांनी गागाभट्ट यांच्या हस्ते राजाभिषेक करवून घेतला. हा दिवस खऱ्या अर्थाने आपला पहिला स्वातंत्र्यदिन आहे! स्वराज्यातील किल्ल्यांच्या दंतकथा, त्यांचा खरा इतिहास, त्यांचे वैशिष्ट्य आणि महत्त्व अशी अभ्यासपूर्ण मांडणी करीत संदीप तापकीर यांनी आताच्या काळात दुर्ग संवर्धनाची गरज आहे, असे आवाहन केले.रत्नप्रभा खोत, मंगला दळवी, उषा गर्भे, अलका इनामदार, नीलिमा कांबळे, मंदाकिनी दीक्षित, अरविंद जोशी, नारायण दिवेकर, राजेंद्र भागवत, सतीश लिपारे, सुधाकर कुलकर्णी, हरिभाऊ क्षीरसागर, सुनील चव्हाण, शहाजी कांबळे यांनी संयोजनात परिश्रम घेतले. नंदकुमार मुरडे यांनी सूत्रसंचालन केले. श्यामकांत खटावकर यांनी आभार मानले. सामुदायिक पसायदानाने व्याख्यानमालेचा समारोप करण्यात आला.

**- प्रदीप गांधलीकर**

९४२१३०८२०१, ७४९८१८९६८२

# संस्कारमुल्ये रुजविण्यासाठी बालसंस्कार शिबिराची गरज- लंके

**अहमदनगर । प्रतिनिधी**

माणसात माणूसपण पेरणारी माणुसकीची शाळा व सावली प्रकल्प यांनी प्रथमच केडगाव, अहिल्यानगर येथे राहत्या घरी आयोजित केलेले हे बालसंस्कार शिबिर म्हणजे संस्कार मूल्य अंगीकारून बालमनाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठीचे महत्त्वाचे पाऊल असून त्यांच्यात कलागुणांची जोपासना होण्यासाठी आज अशा शिबिरांची खूपच गरज आहे. जी संस्कार मूल्ये शिबिर कालावधीमध्ये शिबिरार्थींनी आत्मसात केली. त्याचे योग्य ते पालन करावे. दैनंदिन जीवनात व अभ्यासात देखील तुम्ही शिकलेली आईसक्रिम उपयोगी पडणार आहे. तुमचा आत्मविश्वास, इच्छाशक्ती, सकारात्मक दृष्टीकोन, क्रियाशीलता व महत्वाकांक्षा जीवनात यशस्वी होण्यासाठी



महत्वाचा पाया ठरणार आहे. हा संस्काराचा ठेवा कायमस्वरूपी सर्वांनी जतन करून ठेवावा असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे दैनिक लोकमतचे निवासी संपादक सुधीर लंके यांनी व्यक्त केले.

आपल्या मुलांसाठी शिबिर किती आवश्यक आहे हे पालकांच्या लक्षात येऊन आपल्या पाल्याच्या आवडीनिवडी पाहून जास्तीत जास्त आनंदी व समाधानी राहण्यासाठी पालक म्हणून किती सहभाग देतो याचा विचार पालकांनी करणे गरजेचे आहे. असे प्रतिपादन कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख अतिथी व राष्ट्रसेवा दलाचे माजी जिल्हा संघटक बापू जोशी यांनी व्यक्त केले.

प्रारंभी साने गुरुजी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. माणुसकीचे दुत व शिबिर प्रमुख शिवाजी नाईकवाडी यांनी शिबिर कालावधी मधील वृत्तांत सादर केला. ता. ३ मे ते १२ मे या शिबिर कालावधीमध्ये मनोरंजनाबरोबरच मुला-मुलींना संस्कारक्षम शिक्षण, हसत खेळत व्यवहार ज्ञान, जीवनाच्या विविध अंगांना स्पर्शून जात असलेल्या विषयांची ओळख, देशभक्तीपर गीते, समर गीते, प्रेरणा गीते, बडबड गीते, श्रमांची प्रतिष्ठा सांगणारी गाणी, अंधश्रद्धा निर्मूलनाची गीते, आणि स्फूर्ती गीतांच्या माध्यमातून बालमनाचे सांस्कृतिक परिवर्तन घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

संस्कारमुल्यांबरोबरच स्मरणशक्तीचे विविध खेळ, सूर्यनमस्कार, योगासने, हस्तकला, प्रात्यक्षिक कार्यशाळा, व्यक्तिमत्व विकास, संस्कारक्षम अशा कथामालेच्या माध्यमातून गोष्टी, प्रतिज्ञा व संविधान प्रास्ताविकेचे अभिवाचन आणि पथनाट्य प्रशिक्षण इत्यादी बाबींचा सुद्धा या शिबिरात समावेश करण्यात आलेला होता. या शिबिरामध्ये विनायक सापा सर यांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या प्रयोगातून कार्यशाळा घेतली.

माणसात माणूसपण पेरण्यासाठी हीच आमुची प्रार्थना आणि हेच आमुचे मागणे, माणसाने माणसाशी माणसासम वागणे ही प्रार्थना सामुदायिक म्हणण्यात आली. तदनंतर शिबिरार्थी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. शिबिर कालावधीमध्ये अनघा राऊत यांनी शिबिरार्थींना सूर्यनमस्कार व योगासने शिकवून त्यांच्याकडून करून घेतले. स्वर्गात आकाशगंगा या गीतावर शिबिरार्थींनी लयबद्ध नृत्य सादर केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी पूनम मुथा, नितेश बनसोडे, प्रा.उमादेवी राऊत, रवी राऊत, उषा नाईकवाडी व अश्विनी नाईकवाडी यांनी परिश्रम घेतले.

पालकांनी समक्ष भेटून शिबिराचे आयोजन केल्याबद्दल संयोजन कमिटीचे आभार मानले. व अशा सामाजिक दायित्व असलेल्या उपक्रमाबद्दल कौतुक केले. यापुढेही अशा उपक्रमास आम्ही सहकार्य करू असे सांगितले. शिबिरप्रमुख शिवाजी नाईकवाडी यांनी आभार व्यक्त केले.

## वैद्यकीय महाविद्यालयात शहीद जवानांना श्रद्धांजली



**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारत-पाकिस्तान दरम्यान सध्या तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, सीमेलगत युद्धजन्य परिस्थिती उद्भवली आहे. नुकत्याच या संघर्षात शहीद झालेल्या स्व. मुरली नाईक आणि स्व. सचिन वनंजे या वीर जवानांना अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजतर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. भूषण अनभुले, सचिव डॉ. दिलीप पवार, खजिनदार डॉ. विलास सोनवणे, डॉ. समीर होळकर, डॉ. भूषण चंगेडे तसेच सर्व संचालक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, ''देशाच्या सीमांवर आपले जवान प्राण पणाला लावून लढत आहेत. त्यांच्या सोबत आपण सर्वजण आहोत. त्यांनी स्वतःची काळजी घ्यावी व कर्तव्य बजावून सुखरूप परत यावेत, हीच सदिच्छा आहे.''

भारत मातेच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या वीर सैनिकांचे बलिदान हे देशासाठी अत्यंत गौरवाचे असून ते सदैव स्मरणात राहील, असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी प्राचार्य डॉ. सुनील पवार, डॉ. दिलीप पवार, डॉ. गौरव सोनवणे, डॉ. राजेंद्र थोरात आदी मान्यवर उपस्थित होते.





# रामकथेतून जीवनाला दिशा मिळते- अनिता काळे

### संगीतमय रामकथेचा समारोप; हजारो भाविकांचा उदंड प्रतिसाद

**नगर तालुका । प्रतिनिधी**

तालुक्यातील निंबळक गावात पार पडलेल्या सात दिवसीय संगीत रामकथा ज्ञानयज्ञ सप्ताह सोहळ्याचा समारोप भक्तीमय वातावरणात पार पडला. हभप श्रीनिवास महाराज घुगे यांच्या संगीतमय कीर्तनांनी आणि रामकथेच्या विविध प्रसंगांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. या सप्ताहात त्यांनी रामायणातील प्रसंग सादर करताना आई-वडिलांचे महत्त्व, बंधुप्रेम, आणि समाजातील दुर्बलांच्या मदतीचे मोल असे जीवनमूल्ये प्रभावी भाषेत व संगीताच्या माध्यमातून विशद केली. कीर्तनामध्ये त्यांनी शबरीची भक्ती, भरताचा त्याग आणि सीतेची शुद्धता असे हृदयस्पर्शी प्रसंग सादर करून विविध रामायणातील प्रसंगाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. हा धार्मिक सोहळा श्री संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सव, जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या ३६५ व्या वैकुंठगमन दिनानिमित्त आणि वै. लक्ष्मण रंगनाथ काळे, वै. विजयादेवी लक्ष्मण काळे व वै. अजित लक्ष्मण काळे यांच्या पुण्यस्मरणार्थ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे आयोजन मराठा समन्वय परिषद महाराष्ट्र राज्याच्या कार्याध्यक्षा अनिता काळे यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. सोहळ्याला राणी लंके यांनी उपस्थित राहून सर्व भाविकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी जि.प. सदस्य माधवराव लामखडे, सरपंच प्रियंका लामखडे, उद्योजक अजय लामखडे, आयोजक अनिता काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात महिला भाविकांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. रामाच्या अयोध्यागमनाच्या प्रसंगी महिलांनी आनंदात फुगड्यांचे फेर धरून उत्सवाला रंगत आणली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अनिता काळे यांनी सांगितले की, रामकथेतून जीवनाला दिशा मिळत असते. या कथेतून बोध घेऊन अनेकांचे जीवन सफल झाले. आईची इच्छा पूर्ण करण्यासाठी या कथेचे आयोजन केले होते. या सप्ताहाचे हे पहिले वर्ष असून, भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून हे दरवर्षी आयोजित केले जाईल. तसेच लवकरच महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. सप्ताहातील सात दिवस संगीतमय रामकथेसह विविध धार्मिक कार्यक्रम, हरिपाठ, भजन, अभिषेक आणि महाआरती अशा अध्यात्मिक वातावरणाने गावात भक्तीचा महोत्सव अनुभवता आला. महाप्रसादाच्या वितरणाने सप्ताहाचा समारोप करण्यात आला. या भक्तीमय सोहळ्यामुळे पंचक्रोशीत अध्यात्मिक ऊर्जा निर्माण झाली असून, पुढील वर्षी आणखी मोठ्या प्रमाणात आणि उत्साहात हा सोहळा साजरा केला जाईल, असा विश्वासही काळे यांनी व्यक्त केला.



## सलीम यावर स्मृतिप्रीत्यर्थ मुशायरा संपन्न

**अहमदनगर । आबीद खान**

आजच्या व्यस्त जीवनामध्ये व शासकीय नोकरीत उच्च पदावर असताना सुद्धा अहमदनगर येथील उर्दू शायर सलीम खान यावर यांनी उर्दू साहित्याची आपली आवड पूर्ण करून कवितासंग्रह लिहून ते प्रकाशित केले. व नियमित उर्दू साहित्याची सेवा करत राहिले असे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या सहसचिव प्रसिद्ध कवयित्री डॉ. कमर सुरुर यांनी केले. मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीतर्फे येथील प्रसिद्ध कवी सलीम खान यावर यांच्या समृतिप्रित्यर्थ ताजियती नशिस्त मुशायराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. नवेद बिजापूरे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूसभाई तांबटकर, प्रा.डॉ. महबूब सय्यद, शरीफ खान, जीवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद, कलीम तांबटकर, मुस्कान असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, कलीम शेख, मखदूम सोसायटीच्या डॉ. कमर सुरूर, निसार बागवान, तन्वीर चष्मावाला, जावेद मास्टर आदी मान्यवर उपस्थित होते. मुशायराचे दिप प्रज्वलन युनुसभाई तांबटकर यांनी केले. शरीफ खान, सय्यद खालील व डॉ. कमर सुरुर यांनी सलीम खान यावर यांच्या जीवनावर आपले विचार व्यक्त केले. मुशायरामध्ये सलीम यावर यांच्यावर लिहिलेल्या कविता बिलाल अहदनगरी, सुलेमान अहमदनगरी, सय्यद खलील, डॉ. कमर सुरूर, आसिफभाई, नवेद बिजापूरे, शरीफ खान, हबीब पेंटर, मुन्नवर हुसैन यांनी सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. अध्यक्षपदावरून बोलताना प्राध्यापक नवेद बिजापुरे म्हणाले की भविष्यातील उर्दू साहित्यकांसाठी आजच्या साहित्यकांनी आपले साहित्य पुस्तक रूपात प्रसिद्ध केले पाहिजेत असे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आबिद खान यांनी केले. तर आभार निसार बागवान यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मखदूम सोसायटीच्या सर्व सदस्यांनी भरपूर परिश्रम घेतले.



# भारतीय बौद्ध महासभा शहर शाखेतर्फे बुद्ध जयंती साजरी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे भगवान बुद्ध यांची जयंती (पौर्णिमा) उत्सव साजरी करण्यात आली. सिद्धी बाग येथील बुद्ध विहार येथे शहर शाखेच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर अध्यक्ष बौद्धचार्य दीपक पाटोळे समवेत गौतम पाचारणे, लक्ष्मण माघाडे, रवींद्र कांबळे, संतोष कांबळे, संजय डहाणे, रविकांत कांबळे, रतन तुपविहिरे, प्रकाश खंडागळे, सुमित डहाने, राम गायकवाड, बाबासाहेब डोळस, बाळू बनकर, मयूर गायकवाड, किरण उजागरे, करुणा गायकवाड, शोभा गाडे, माया उजागरे, मंदा भोसले, एकनाथ गायकवाड, सुमेध क्षीरसागर, शिंदे मेजर आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. या प्रसंगी त्रिसरण बुद्ध पूजा पाठ करण्यात आली व भगवान बुद्धांच्या गुणाचे स्मरण करण्यात आले व बौद्धाचार्य दीपक पाटोळे यांनी भगवान बुद्ध यांचे जीवन चरित्र सांगुन बुद्ध पूजापाठ घेतली दुपारी धम्मदेसनेचा कार्यक्रम झाला. पुढे पाटोळे म्हणाले की, संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त बौद्ध महासभेच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.



मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



## खंडागळे यांचा यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान

### ग्रामस्थांतर्फे नागरी सत्कार

**नगर तालुका । प्रतिनिधी**

नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी येथील रहिवाशी व सध्या रयत शिक्षण संस्थे मध्ये कार्यरत असलेले शिक्षक प्रशांत बबनराव खंडागळे यांना नुकताच रयत शिक्षण संस्थेचा सर्वोच्च यशवंतराव चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला. त्यानिमित्त पिंपळगाव माळवी ग्रामस्थांच्या वतीने श्री संत सावता माळी ग्रामीण पतसंस्थेच्या वतीने प्रा. देवराम शिंदे यांनी त्यांचा नागरी सन्मान केला.

यावेळी माजी मुख्याध्यापक विजय गायकवाड, रोहिदास पुंड, संतोष बनकर, मंगेश बनकर, विश्वनाथ झिने, रोहिदास शेळके उपस्थित होते. यावेळी बोलताना प्राध्यापक शिंदे म्हणाले की खंडागळे यांचा आदर्श गावातील ग्रामस्थांनी व विद्यार्थ्यांनी घ्यावा.

प्रशांत खंडागळे हे कृतिशील शिक्षक असून त्यांना या अगोदर महाराष्ट्र राज्य शिक्षक पुरस्कार, राष्ट्रीय वोडाफोन शिष्यवृत्ती, पर्यावरण व वन मंत्रालयातर्फे सन्मान व राष्ट्रीय स्तरावर विज्ञान व तंत्रज्ञान विषयाचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल पिंपळगाव माळवी ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

# माजी विद्यार्थी हा विद्यालयाचा कणा- पाचपुते

## मल्टीपर्पज हॉल पूर्णत्वास नेणार- माजी विद्यार्थी संघाची उद्घोषणा

**श्रीगोंदा । सचिन झगडे**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा संकुलातील महादजी शिंदे विद्यालयामध्ये माजी विद्यार्थी संघाच्या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महादजी शिंदे विद्यालयाच्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला व येणाऱ्या काळात होणाऱ्या बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम पूर्णत्वास जाईल अशी घोषणा केली. यावेळी माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष डॉ. भाऊसाहेब दांगडे यांनी माजी विद्यार्थी संघ विद्यालयाच्या विकासात भरीव भूमिका पार पाडणार आहे, तसेच ज्या बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम पूर्णत्वास नेले जाईल त्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही असे माजी विद्यार्थी संघाच्या वतीने डॉ. भाऊसाहेब दांगडे (आयएएस) यांनी स्पष्ट केले.

माजी विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे रुपये अकरा लाखाची देणगी यावेळी संघाच्या वतीने जाहीर करण्यात आली. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोस यांनी माजी विद्यार्थी संघाने आता शाखांच्या वाढ आणि विस्ताराची जबाबदारी माजी विद्यार्थी संघाने घ्यायला हवी असे आवाहन केले.



माजी आमदार व माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी माजी विद्यार्थी हा शाळेसाठी दिशादर्शक बनला पाहिजे.

या दृष्टीने माजी विद्यार्थी संघाने काम करावे अशी आवाहन केले. विद्यालयाचे गुणवत्ता कक्ष प्रमुख सुधीर साबळे यांनी महादजी शिंदे विद्यालयात कोडींग, पायथॉन, गेम डिझायनिंग तसेच आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर आधारित अभ्यासक्रम जून पासून सुरु होणार असल्याची माहिती दिली. आवाहनाला प्रतिसाद देत तरुण माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे बहुउद्देशीय हॉलच्या बांधकामासाठी भरीव देणगी दिली. संजय कुलकर्णी १,००,००० , उद्योजक संजय मचे १०००००, विजय कारंडे ५५,५००, दादाराम सप्रे ५१०००, डॉ. राजेंद्र त्रंबके ५१०००, विठ्ठलराव दरेकर ११०००, सुजित रायकर ११०००, अक्षय शिंदे ११०००, ओंकार संतोष शिंदे ११०००, अक्षय राऊत २५०० या माजी विद्यार्थ्यांनी देणगी दिली. विस्तार अधिकारी सिताराम भुजबळ, ॲड. संतोष मोटे, डॉ.सोपान शिंदे, विलास दरेकर सचिव माजी विद्यार्थी संघ, संजय मचे युवा उद्योजक, डॉ. राजेंद्र त्रंबके, डॉ होले, रासकर डी एम, साहेबराव खामकर, मनोहर पोटे, बाजीराव कोरडे, कुंडलिकराव दरेकर जनरल बॉडी सदस्य, ॲड सुधीर भागवत विद्यालयाचे माजी सेवक, माजी विद्यार्थी ,रयत हितचिंतक सर्व पदाधिकारी, नगरसेवक, पत्रकार बांधव, ग्रामस्थ आणि माजी विद्यार्थी व माजी विद्यार्थी संघाचे सर्व सदस्य उपस्थित होते. बैठकीचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, सूत्रसंचालन विलास लबडे, तर आभार प्रदर्शन सचिन झगडे यांनी केले.



## मोफत अस्थिरोग निदान शिबीर संपन्न

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

येथील आव्हाणे बु (गणपती) याठिकाणी रविवार ता. ११ मे २०२५ रोजी मणका, हात, पाय, खांदा तसेच हाडांसंबंधित सर्व आजारावरती मोफत रोग निदान शिबिराचे आयोजन समस्त आव्हाणे बु पंचक्रोशी ग्रामस्थ व शिवराज्य प्रतिष्ठाण आव्हाणे खु यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. शिबिरामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध व अनुभवी अस्थिरोग तज्ञ डॉ. ललित भिसे व त्यांच्या टीम मार्फत सुमारे २०० रुग्णांची हाडांसंबंधीत आजारांची मोफत तपासणी तसेच हाडामधील कॅल्शियमची तपासणी करण्यात येऊन गरजू रुग्णांना अत्यंत माफक दरात गोळ्या- औषधे देण्यात आली. या शिबिराचे उदघाट वैष्णव सेवा आश्रमाचे हभप सोमेश्वर महाराज गवळी व हभप निलेश महाराज वाणी त्याचप्रमाणे हभप अर्जुन महाराज चितळे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती संजय कोळगे, बबन भुसारी,कचरू चोथे, अंबादास कळमकर, वसंत देवा भालेराव, सुनिल आहेर,ऋषिकेश आहेर, महेश काकडे, सुंदर चोथे आदि मान्यवर उपस्थित होते. शिबीर यशस्वी करण्यासाठी राहुल गोर्डे ,महेश आहेर तसेच शिवराज्य प्रतिष्ठाणच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कुटुंबीयांच्या साश्रू नयनांकडे पहात जवानाने घेतला निरोप

### भोसे येथील जवान प्रशांत टेमकर तातडीने कर्तव्यावर दाखल

**नितीन गटाणी । पाथर्डी**

एकुलता एक भाचा,.. मामा सुद्धा एकच... भाच्याच्या लग्नात खूप धमाल करू, लाडक्या बहिणीचे कौतुक करू असे ठरवून सैन्य दलातून दहा दिवसांची सुट्टी काढून आलेल्या तालुक्यातील भोसे येथील प्रशांत टेमकर या जवानाला तातडीचा आदेश आला. मनाने व्यतीत झालेल्या बहिणीला समजावत...मी एक मामा भाच्या मागे लग्नात उभा राहिला नसलो तरी... संपूर्ण गाव मामा म्हणून मागे उभा राहील.. युद्ध संपले की मी परत येतो.. असे सांगत जवानाने कुटुंबीयांच्या डबडबल्या डोळ्यांकडे पाहत अहिल्यानगर रेल्वे स्टेशनची वाट धरली.



याबाबत अधिक माहिती अशी की, तालुक्यातील भोसे येथील जवान टेमकर हा हरियाणा मधील हिस्सार येथे गेल्या पाच वर्षांपासून सैन्य दलात कार्यरत आहे. कुटुंबातील एकुलत्या एक भाच्याचे लग्न आठ दिवसांवर येऊन ठेपल्याने संपूर्ण कुटुंबीय लग्नाच्या धावपळीत राहून सर्वत्र लगीन घाई सुरू होती. अचानकपणे भारताने पाकिस्तानवर एअर स्ट्राइक सुरू करून देशाच्या सीमेवर युद्धाचे सायरन वाजू लागले. सुट्टीवर गेलेल्या सर्वच जवानांना तातडीने कर्तव्यावर हजर राहण्याचे आदेश निघाले. असाच आदेश टेमकर यांनाही मिळाला. आदेश पाहून त्यांनी काही मिनिटातच बॅग आवरली. कुटुंबीयांना वाटले, कुठेतरी लग्नाच्या कामासाठी जायचे असेल. परंतु निघण्यापूर्वी काही मिनिटे त्यांनी मला तातडीचा आदेश आला आहे. कुठल्याही परिस्थितीत मला ड्युटीवर जावे लागेल. असे सांगत घरच्यांना कल्पना दिली. लग्नात मामा नाही, याची जाणीव होताच कुटुंबीयांसह बहिणीच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. एव्हाना छोट्याशा गावात ही वार्ता सर्वत्र पांगली. बहुसंख्य ग्रामस्थ टेमकर यांच्या घरापुढे आले. त्यांनी कुटुंबीयांची समजूत काढली. संपूर्ण गाव मामा म्हणून भाच्या मागे उभा राहील... अशा शब्दात आश्वासन देत निरोप दिला. भारत माता की जय, जय भवानी, जय शिवाजी, अशा घोषणांनी गावकऱ्यांमध्ये एक वेगळेच चैतन्य निर्माण झाले. या चैतन्यामुळे कुटुंबीयांच्या डोळ्यातील अश्रू ही आपोआप थांबले. सर्वांना धीर देत कर्तव्य श्रेष्ठ आहे मला गेलेच पाहिजे असे सांगून पत्नी व सहा महिन्याच्या मुलाला घेत टेमकर यांनी अहिल्यानगरचे रेल्वे स्टेशन गाठले. रेल्वे स्टेशनवर सुद्धा पत्नीला समजावून सांगत कुटुंबीयांकडे लक्ष दे. त्यांना भावनिक होऊ देऊ नका. खूप धाम-धुमीने लग्न करा. लग्नाचे फोटो व व्हिडिओ मोबाईलवर मला पाठवा . असे सांगत पत्नीला ही धीर दिला. सहा महिन्याचा मुलगा बाबांकडे धाव घेई. त्यालाही कुरवाळत त्याने आईकडे दिले. रेल्वे येत असल्याची घोषणा झाली. काही क्षणातच प्लॅटफॉर्मवर रेल्वे येताच रेल्वे बोगीच्या दारातून लाडक्या मुलाला टाटा करत प्रशांत यांनी पत्नी व मुलाचा ही निरोप घेतला. तालुक्यातील दगडवाडी, लोहसर, खांडगाव, घाटशिरस, करंजी, भोसे, देवराई, त्रिभुवनवाडी अशा पट्ट्यामध्ये अनेक माजी सैनिक आहेत. युद्ध सुरू झाल्यास आपल्याला पण निरोप मिळावा, शत्रूचा गळा घोटण्याची संधी आम्हालाही मिळावी यासाठी अनेक माजी सैनिक वाट पाहत आहेत. ग्रामीण भागात सर्वत्र युद्धमय वातावरण निर्माण होऊन भारताच्या विजयासाठी देशवासीयांकडून प्रार्थना केल्या जात आहेत.



## संताशिवाय मानवी जीवन अपूर्ण- हभप बटूळे

### वै. संत नारायण महाराज पुण्यतिथी साजरी

**शेवगाव । ऋषिकेश काळे**

संताशिवाय मानवी जीवन अपूर्ण आहे. भगवंताची कृपा जर आपल्यावर व्हावी असे वाटत असेल तर धरावे संताचे ते पाय. साधुसंतानी जरी आपल्या बाजूने वकीलपत्र घेतले तर निकाल हा आपल्याच बाजूने लागेल.

असे आवाहन हभप बटूळे महाराज यांनी लोळेगाव येथे नवनाथ डमाळे मुकादम यांच्या सहकार्याने संत नारायण महाराज तारकेश्वर गड यांची १४ वी पुण्यतिथी मोठ्या उत्साहाने संपन्न झाली. तालुक्यातील लोळेगाव येथे वै. संत नारायण महाराज यांची पुण्यतिथी भव्य दिव्य साजरी करण्यात आली. हरिप्राप्तसी उपाय धरावे, संताचे ते पाय... या अभंगातून महाराज यांनी संताच्या दर्शनाने अनंत जन्माचा शिन जातो. ज्या दिवशी आपल्याला संताचे दर्शन होईल तो दिवस आपल्या भाग्याचा असेल. जिथे साधू संताची कृपा होते.

तिथे काहीच शिल्लक राहत नाही. संत संगतीत मानवी जीवनाचा उद्धार आहे.त्यासाठी संताशिवाय पर्याय नाही.संताविना प्राप्ती नाही.असे आवाहन केले. या प्रसंगी हभप नामदेव महाराज जाधव, बहिरनाथ महाराज काळे, हरी महाराज, संतोष चोपडे, डमाळे बाबा, ओम नवघरे विठ्ठल डोंगरे, संभाजी पठाडे, सुखदेव विधाटे, सूर्यभान डमाळे, बबनराव ठुबे, नानासाहेब पठाडे, सामनगाव,जोहरापुर, लोळेगाव येथील भजनी मंडळी व ग्रामस्थ महीला मंडळी उपस्थित होते. नंतर महाप्रसादाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमाचे आयोजन नवनाथ डमाळे मुकादम यांनी केले होते.



## संजीवनी पॉलीटेक्निकच्या सहा अभियंत्यांची आयएफबी कंपनीत नोकरीसाठी निवड

### अंतिम निकालाच्या अगोदरच नोकरीचे मिळाले पत्र

**कोपरगाव । किसन पवार**

संजीवनी के.बी.पी.पॉलीटेक्निकच्या टी अँड पी विभागाच्या प्रयत्नाने अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवुन देण्यासाठी या विभागाने आयएफबी इलेक्ट्रॉनिक्स कंपनीच्या कॅम्पस मुलाखतीचे आयोजन केले होते. यात कंपनीने इलेक्ट्रिकल इंजिनिअरींगच्या सहा अभियंत्यांची आकर्षक पगारावर नोकरीसाठी निवड केली आहे. या विभागाच्या प्रयत्नाने विद्यार्थ्यांच्या हातात त्यांच्या अंतिम नोकरीचे नेमणुक पत्र प्राप्त झाले आहे. आयएफबी इलेक्ट्रॉनिक्स या गृहोपयोगी उपकरणाचं उत्पादन करणाऱ्या कंपनीने नोकरीसाठी निवड केलेल्या नवोदित अभियंत्यांमध्ये गायत्री धमेंद्र देवरे, साक्षी शशिकांत , संतोश कुमार, गोरक्षनाथ ज्ञानेश्वर इपर, प्रतिक संजय गायकवाड व शाम कुमार यांचा समावेश आहे. सध्या तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे. नामांकित कंपन्या उत्पादन प्रक्रियेमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा व मशिनरींचा उपयोग करतात.

वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये अभियंत्यांना कोणते तंत्रज्ञान अभिप्रेत आहे, याचा अभ्यास करून त्या तंत्रज्ञानावर अधिकचा भर देवुन ते विद्यार्थ्यांना शिकवून न त्यावर लेखी व तोंडी चाचणी घेवुन विद्यार्थ्यांना परीपूर्ण केल्या जाते. तसेच टी अँड पी विभागाकडून कंपनी निहाय मुलाखतींचा सराव करून घेतला जातो. त्यामुळे विद्यार्थी वेगवेगळ्या कंपन्यांच्या मुलाखतींना सहज सामोरे जातात व यशस्वीही होतात. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे यांनी सर्व विद्यार्थी व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# अवकाळी वादळाने फळबागाचे नुकसान, तलाठ्यांनी केली नुकसानीची पाहणी

**नेवासा । विजय खंडागळे**

सोनई परिसरात वादळ वारा गारपीठ अवकाळी पाऊसाने खाण झोपडपट्टी, श्रीरामवाडी, लांडेवाडी रोड, खेडलेपरमानंद रोड आदी भागात पिकांचे प्रचंड नुकसान झालेले होते. सोनईचे तलाठी नवाळी यांनी दखल घेत परिसरातील पिकांच्या नुकसानीची पाहणी केली. सोनई येथील खेडले रस्त्यावरील भाऊसाहेब दरंदले यांच्या अर्धा एकर प्लॉटवरील सुमारे ४०० केळीचे झाडे आहेत. यापैकी बऱ्याच केळीच्या झाडांचे नुकसान झाले.

आ. विठ्ठलराव लंघे यांनी तहसीलदार डॉ. संजय बिरादार यांना तात्काळ सोनई परिसरातील नुकसानीची पाहणी करण्याबाबत आदेश दिले होते यामुळे सोनईचे तलाठी नवाळी यांनी सोनई परिसरात ता. ४ मे रविवारी सायंकाळी आलेल्या अवकाळी पाऊस आणि वादळ वाऱ्यासह गारपीट मुळे सोनई गावासह परिसरातील नुकसानीची पाहणी केली. खेडले रोडच्या भाऊसाहेब दरंदले यांचे अर्धा एकर केळीच्या बागाचे नुकसान झाले. सुमारे ४०० केळीचे झाडे व २५ आंब्याचे झाडे यांचे नुकसान झाले. सोनई लांडेवाडी रोडवरील युवा कार्यकर्ते



डॉ. ज्ञानेश्वर दरंदले यांचा उस शेतजमिनीला लोळला. बांबोरी रोड येथील पाटोळे यांच्या कांदा पिकांचे नुकसान झाले आहे. अनिल निमसे यांच्या बाजरीच्या पिकाचे नुकसान झाले. या परिस्थितीवर सोनईचे तलाठी नवाळी यांनी नुकसानीची पाहणी केली. नुकसानीबाबत मदत ही शासनाने निर्णय घेतल्या नंतर मिळेल असे शासकीय अधिकारी यांनी स्पष्ट केले.

# सावित्रीच्या लेकींचे प्रेरणादायी यश!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. राज्याचा बारावीचा निकाल ९१. ८८ टक्के लागला. नेहमीप्रमाणे कोकण विभागाने या निकालात बाजी मारली. कोकण विभागाचा ९६ . ७४ टक्के निकाल लागला असून कोकण विभागाने राज्यात अव्वल स्थान पटकावले असून लातूर विभाग निकालात तळाशी राहिला आहे. लातूर विभागाचा निकाल ८९. ४६ टक्के इतका



लागला आहे. लातूर विभाग टक्केवारीत सर्वांचा मागे पडला हे या निकालातून स्पष्ट दिसते. मागील दशकात लातूर विभाग हा दहावी बारावीच्या निकालात सातत्याने अग्रस्थानी राहिला आहे. लातूर पॅटर्न हा दहावी बारावीच्या निकालासाठी राज्यात प्रसिद्ध होता. आताही नीट आणि जेईई परीक्षेच्या तयारीसाठी विद्यार्थ्यांची पसंती लातूरलाच असते. नीट आणि जेईईची तयारी करण्यासाठी विद्यार्थ्यांची पहिली पसंती पुणे आणि दुसरी पसंती लातूर असते. ज्यांना शक्य आहे ते पालक आपल्या पाल्यांना राजस्थानातील कोटा येथेही पाठवतात मात्र महाराष्ट्रात लातूर पॅटर्नने आपली एक वेगळी ओळख निर्माण केली असताना लातूरची निकालात इतकी घसरण होणे हे आश्चर्यकारकच आहे. अर्थात निकालात घसरण फक्त लातूर विभागाची झाली असे नाही तर संपूर्ण राज्याचा निकाल यावर्षी घसरला आहे. यावर्षी राज्याचा निकाल ९१. ८८ टक्के लगला जो मागील वर्षीच्या तुलनेत १.४९ टक्क्यांनी कमी आहे. मागील वर्षी म्हणजे २०२४ साली बारावीचा निकाल ९३.३७ टक्के होता. यावर्षी बारावीचा निकाल का घसरला ? असा प्रश्न विचारला जात आहे. यावर्षी राज्य सरकारने कॉपी मुक्त परीक्षा अभियान राबवले त्यामुळे हा निकाल घसरला असण्याची शक्यता आहे. अर्थात हे चांगलेच झाले. कॉपीमुक्त परीक्षा या अभियानामुळे राज्याची खरी गुणवत्ता समोर आली. मध्यंतरी राज्याचा निकाल हा ९७ ते ९९ टाक्यांच्या दरम्यान असायचा आणि त्यात शेकडो विद्यार्थ्यांना पैकीच्या पैकी गुण मिळायचे. सरकारने कॉपीमुक्त परीक्षा हे अभियान राबवल्या मुळे कॉपिला काही प्रमाणात आळा बसला आहे. सरकारने हे अभियान यापुढेही चालू ठेवावे. विद्यार्थ्यांनी कॉपिवर अवलंबून न राहता वर्षभर नियमितपणे अभ्यास करावा कारण काळ झपाट्याने बदलत आहे. आता शिक्षणातही तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला आहे. आज उत्तरपत्रिका शिक्षक तपासित आहेत पण भविष्यात या परीक्षांच्या उत्तरपत्रिका ए आय च्या मदतीने तपासल्या जातील. जेंव्हा ए आय तंत्रज्ञान वापरून उत्तरपत्रिका तपासल्या जातील तेंव्हा निकाल आणखी घसरण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्हा परिषदेचे तंत्रस्नेही शिक्षक दिसले गुरुजींनी यावर्षी त्यांच्या वर्गाच्या उत्तरपत्रिका ए आय तंत्रज्ञान वापरून तपासल्या. ए आय तंत्रज्ञानाने अवघ्या काही सेकंदात एक उत्तर पत्रिका तपासून होते हे त्यांनी दाखवून दिले त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर भविष्यात उत्तर पत्रिका तपासण्याकरिता होणार हे नक्की त्यामुळे यापुढे विद्यार्थ्यांना अभ्यासाशिवाय गत्यंतर नाही. अर्थात राज्याचा एकूण निकाल घसरला असला तरी या निकालात मुलींनी नेहमीप्रमाणे बाजी मारली आहे. यावर्षी जवळपास ९४.५८ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. मुलांपेक्षा मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण जवळपास ५ टक्क्यांनी अधिक आहे. मुलांचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ८९.५१ टक्के इतके आहे. अर्थात दहावी असो की बारावी निकालात कायम मुलीच बाजी मारत असतात हे आपण यावर्षीच नाही तर मागील अनेक वर्षापासून पाहत आहोत. निकालात मुलींनी बाजी मारणे ही नक्कीच अभिमानास्पद बाब आहे. परीक्षार्थी मुलींची संख्या कमी असूनही उत्तीर्ण होणाऱ्या मुलींचे प्रमाण जास्त असणे हे मोठ्या शैक्षणिक आणि सामाजिक परिवर्तनाचे लक्षण आहे. सावित्रीच्या लेकिंची ही गरुड भरारी पाहून संपूर्ण महाराष्ट्राची मान अभिमानाने उंचावली आहे. एकेकाळी केवळ चूल आणि मूल इतकेच ज्यांचे जग होते त्या मुली आज गगनभरारी मारत आहेत. सावित्रीच्या लेकींचे हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. एकेकाळी ज्या मुलींना शिक्षणापासून वंचित ठेवले जात होते त्याच मुली आज शिक्षण व्यवस्थेचे सर्वात मोठे संचित बनू पाहत आहे. पुरोगामी महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. कठोर परिश्रमाने मुलींनी हे यश मिळवले आणि इतरांना प्रेरणा दिली. कठोर परिश्रमातून मुलींनी हे यश मिळवून समाजाला एक सकारात्मक संदेश दिला आहे. बारावीच्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन आणि सर्व विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस मनापासून शुभेच्छा!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद







## सनराईजचा बारावी निकाल १०० टक्के

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

येथील सनराईज सायन्स, आर्टस, कॉमर्स महाविद्यालयाचा बारावीचा तीनही विभागांचा निकाल १०० टक्के लागला आहे, अशी माहिती प्राचार्या राजश्री शिंदे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च शिक्षण मंडळ पुणे, यांनी शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ निकाल जाहीर केला असून पुणे विभाग मधील सनराईज महाविद्यालय श्रीगोंदे (कनिष्ठ महाविद्यालय) श्रीगोंदे येथील सिद्धांत संदीप खाडे याने ८३.६७ टक्के गुण मिळवून सायन्स विभागात प्रथम, स्वरा सुदाम पवार हिने ७०.५० टक्क्यांसह कॉमर्स विभागात प्रथम, सुहानी राजेंद्र दरेकर ही ८१ टक्के गुण मिळवून आटर्स विभागात प्रथम आली आहे. संस्थेचे अध्यक्ष सतीश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मोहटादेवी सेवा प्रतिष्ठानने केजी टू पीजी शिक्षणाची व्यवस्था तालुक्यातील वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना अल्प शैक्षणिक शुल्क मध्ये शैक्षणिक सुविधा श्रीगोंदा शहरात उपलब्ध केली आहे. त्याच बरोबर माहिती तंत्रज्ञान व कॉम्प्युटर सायन्स हे विषय चालू शैक्षणिक वर्षापासुन इयत्ता ११ वि प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ मिळणार आहे. तसेच विद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी वर्षभर विविध उपक्रम राबविले जातात. याचा फायदा विद्यार्थ्यांना होतो.

यंदा बऱ्याच महाविद्यालयांचे बारावीचे निकाल कमी लागलेले आहेत. असे असतानाही सनराईज महाविद्यालयाने तीनही विभागांचा शंभर टक्के निकाल लावून शैक्षणिक क्षेत्रात झेप घेतली आहे. सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शिक्षक व पालकांनी अभिनंदन करून पुढील शैक्षणिक करियरसाठी शुभेच्छा दिल्या.

# अवकाळी पावसाने पिकांचे नुकसान; बैलाचा मृत्यू



**पाथर्डी । नितीन गटाणी**

**तालुक्यातील तीन खडी येथे अवकाळी पावसात सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास शंकर खाडे यांच्या घराच्या अंगणात बांधलेल्या बैलाच्या अंगावर वीज कोसळली यामध्ये बैलाचा मृत्यू झाला.**

अवकाळी पावसाची तालुक्यात जोरदार हजेरी लागून तालुक्याच्या बहुसंख्य भागामध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. काही भागात मुसळधार पावसाने कांदा व आंब्याचे प्रचंड नुकसान झाले. मढी येथे पहिल्याच पावसाने सखल भागात पाणी साचून घरामध्ये पाणी शिरले. काल दुपारनंतर तालुक्याच्या पश्चिम भागात विशेषतः करंजी, तिसगाव पट्ट्यात पाऊस झाला. आज करंजी घाट, देवराई, तिसगाव, मढी, निवडूंगे, माणिकदवंडी, आल्हनवाडी, मोहटा, टाकळीमानुर, कोरडगाव अशा पट्ट्यामध्ये मध्यम ते मुसळधार स्वरूपाचा पाऊस झाला. विजांचा कडकडाट होत दुपारनंतर वीज पुरवठा बंद झाला. जोरदार वाऱ्यामुळे आंब्याच्या झाडावर लगडलेल्या कैऱ्यांचा सडा पडून अंबा उत्पादकांचे नुकसान झाले. मान्सून पूर्व पावसामुळे यंदा आंब्याच्या व्यवसायामध्ये शेतकरी तोट्यात असून पहिल्या टप्प्यातच ५० ते ७० रुपये किलो दराने गावरान व केशर आंब्याची विक्री सुरू आहे. मागील वर्षी या दिवसांमध्ये शंभर ते सव्वाशे रुपये किलो दराने आंबे विकले गेले. सुसरे येथील बाजारात आज पन्नास रुपये किलो दराने केशर आंबा विकला गेला. उन्हाळी बाजरी, कांदा अशा पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. माणिक दवंडी भागात जोरदार पावसामुळे काही काळ ग्रामीण भागातील वाहतूक बंद झाली. तालुक्यातील टाकळीमानुर परिसरातही अशाच स्वरूपाचा पाऊस झाला. पाथर्डी शहरात दुपारी साडेचार नंतर पावसाला सुरुवात होऊन सुमारे पावणे सहा वाजेपर्यंत मध्यम स्वरूपाचा जोरदार पाऊस सुरू होता. रस्त्यावर बसलेल्या विक्रेत्यांचे यामुळे एकच धावपळ घडून वाऱ्यामुळे इतरत्र सुरक्षेचा विचार न करता लावलेले फ्लेक्स बोर्ड उनमळून पडले. उद्या लग्नाची मोठी तिथी असून आज आशा सर्वच ठिकाणी हळदी समारंभाचे आयोजन आहे. अशा ठिकाणीही पावसामुळे विस्कळीतपणा आला. खरीप हंगाम पूर्व मशागतीसाठी असा पाऊस उपयुक्त असला तरी साधारणतः पण पंधरा दिवस अगोदर बिगर मोसमी पाऊस आल्याने नुकसानीचा आकडा मोठा राहिला. ग्रामीण भागामध्ये जोरदार वाऱ्यामुळे विजेच्या तारा तुटून धोका होऊ नये म्हणून वीज वितरण कंपनीने वीजपुरवठा बंद करून ठेवला. उकाड्याने हैराण झालेल्या शहरवासीयांना मात्र या पावसाने थोडासा दिलासा मिळाला. पावसाने भिजलेल्या किंवा पाणी लागलेल्या झाडावरील कैऱ्या लोणच्याला तेवढ्या दर्जेदार समजल्या जात नसल्याने आता लोणच्यासाठी चांगल्या कैऱ्यांची शोधा शोध गरजूंना करावी लागणार आहे. शहरातील वीजपुरवठा सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास सुरळीत सुरू झाला. मोहरी, करोडी, परिसरात जोरदार वाऱ्यामुळे झाडाच्या फांद्या पडून शेतकऱ्यांचे किरकोळ नुकसान झाले.

## ५२ हजार यात्रेकरू यंदा हजपासून वंचित; अधिकाऱ्यांनी मुदतीत पैसे न पाठविल्याने पेच

**मुंबई । शफीक बागवान**

केंद्रीय अल्पसंख्यांक मंत्रालयाच्या भारतीय हज कमिटी ऑफ इंडिया आणि मुंबई हज कमिटीमधील काही अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे यंदा भारतातील सुमारे ५२ हजार यात्रेकरू हज करण्यापासून वंचित राहणार आहेत. यामुळे हज करणाऱ्यांमध्ये सर्वत्र प्रचंड असंतोष पसरला आहे. भारतातील ८०० टूर्स कंपन्यांकडून यंदा सुमारे ५२ हजार नागरिकांना हजसाठी पाठवण्यात येणार होते.

मात्र मुंबई हज कमिटीच्या अधिकाऱ्यांनी सौदी अरेबिया सरकारकडे हज यात्रेकरूंकडून जमा केलेली रक्कम मुदतीत न पाठविल्यामुळे हा पेच निर्माण झाला आहे. संपूर्ण मुस्लिम समाजात या अधिकाऱ्यांच्या विरोधात आता प्रचंड असंतोष आणि नाराजी पसरली आहे. भारतातील या ८०० टूर्स कंपन्यांनी या ५२ हजार यात्रेकडून सुमारे २६० कोटी रुपये जमा केले आहेत. हज कमिटी कडून भारतातून सुमारे १ लाख २५ हजार हज यात्रे करुंना यंदा हजला नेण्यात येणार आहे.



या व्यतिरिक्त टूर्स कंपन्यांकडून या ५२ हजार लोकांना हजला नेण्यात येणार होते. मुंबई हज कमिटी चे अधिकारी आणि टूर्स कंपन्यांच्या मालकांनी या ५२ हजार यात्रेकरूंना गेल्या काही महिन्यांपासून अंधारात ठेवले. टूर्स कंपन्यांनी जमा केलेली कोट्यवधीची रक्कम सौदी अरेबिया सरकारकडे जमा करावेत, असा आदेश सौदी सरकारने भारत सरकारला देऊनही टूर्स चालक तसेच हज कमिटी च्या अधिकाऱ्यांनी हे पैसे मुदतीत न पाठविले नाही. १८ जानेवारी ते १८ मार्च यादरम्यान हज यात्रेकरुंकडून हे पैसे जमा करण्यात आले मात्र ते सौदी सरकारला जमा करण्यात आले नाहीत. मक्का आणि मदिना येथे या हजयात्रे करुंची संपूर्ण व्यवस्था करण्यासाठी एका हज यात्रे करुकडून ५० हजार रुपये टूर्स कंपनी आणि हज कमिटी अधिकारी यांनी जमा केले होते. सौदी सरकारने यासंदर्भात हज कमिटी आणि टूर्स कंपन्यांना वेळोवेळी आदेश देऊनही त्यांनी हे पैसे सौदी सरकारला वेळेवर न पाठ विल्याने त्याचा परिणाम म्हणून या ५२ हजार यात्रेकरूंना हज करण्यापासून आता थांबावे लागणार आहे. सी. पी. बक्षी, सुरेंद्र श्रीवास्तव, बी. गोमासे आणि युसुफ खरडा या चार अधिकाऱ्यांवर या संदर्भात अनेक गंभीर आरोप आहेत. युसुफ खरडा यांच्या अलखालील ,अलायन्स अल– इम्रान या कंपन्यांनी भारतात ५२ हजार लोकांकडून प्रत्येकी २ हजार रुपये जमा करण्यासाठी २६ जणांची टीम बनवली. या सर्वांनी प्रत्येकी दोन हजार रुपये जमा केल्याची कुठलीही माहिती कागदावर नसल्याने मोठा पेच निर्माण झाला आहे. मुंबई येथे हज हाऊसचे काम आजही चालू असून या संदर्भातील काही नागरिकांच्या तक्रारीचे अद्यापही निराकरण करण्यात आले नाही. हज हाऊसचे अधिकारी या संदर्भात काहीही बोलायला तयार नाहीत. मुंबई हज हाउस ला पोलिसांच्या छावणीचे स्वरूप प्राप्त झाले असून या हज हाउस मध्ये कोणत्याही नागरिकाला तसेच सदस्यानाही प्रवेश दिला जात नाही. यामुळे हज यात्रे करुंवर मोठा अन्याय असून भारत सरकारने या संदर्भात तातडीने उपाययोजना करत याबाबत ५२ हजार यात्रेकरूंना हजला पाठवावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य हज कमिटीचे सदस्य ठाणे येथील इमरान शेख यांनी केली आहे. मुंबई हज हाऊस मधील अधिकारी हे अप्रशिक्षित असून या हज संदर्भातील कोणत्याही ज्ञानाची त्यांच्याकडे माहिती नाही. हज कसे करावे या संदर्भात ते काहीही माहिती देऊ शकत नाही. या संदर्भातील त्यांनी कोणतेही प्रशिक्षण घेतले नाही, असे असतानाही त्यांना त्या ठिकाणी नेमण्यात आले, ही हज यात्रेकरूंची फसवणूक असल्याचे शेख म्हणाले. या सर्व प्रकरणात सुमारे २६० कोटी रुपयांचा मोठा घोटाळा असून यात वाढही होऊ शकते, असा दावा ही शेख यांनी केला आहे. मुंबई हज कमिटीतील अधिकाऱ्यांच्या वर्तणुकीबद्दल आपण मात्र निशब्द आहोत, असे शेख म्हणाले. मुंबई हज हाऊस मध्ये साधा टेन्ट ही लावण्यात आलेला नाही. इतर कोणत्याही सुविधा तेथे उपलब्ध नाहीत. हज यात्रे करुंच्या जीवाशी आणि भावनेशी हे अधिकारी खेळत आहेत. हज हाऊस मध्ये जाणाऱ्या कोणत्याही नागरिकाला कार्यकारी अधिकारी भेटणार नसल्याचे सांगितले जाते.

हज कमिटीचे मालक कोण आहेत? असाही सवाल शेख यांनी केला आहे. आपण केलेल्या पत्र व्यवहारा संदर्भात आपल्याला कोणतेही उत्तर अद्यापही देण्यात आलेले नाही अशी अवस्था जर आपली असेल तर सर्वसामान्य नागरिकांची काय व्यथा असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून या हज यात्रेकरूंची हज करण्याची इच्छा होती मात्र अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे त्यांचे स्वप्न हे आता स्वप्नच राहिले आहे. अधिकाऱ्यांनी पैसे घेऊनही ते हजला पाठवू शकत नाही त्यात सरकारची काहीही चूक नाही. तत्कालीन मुख्यमंत्री आणि विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे चुकीला कधीही समर्थन देत नाही. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी आपली गेल्या तीन वर्षापूर्वी या पदावर नियुक्ती केली आहे या सर्व बाबी त्यांच्या कानावर घालण्यात आल्या आहेत असेही शेख म्हणाले. हज हाऊस मधील अधिकाऱ्यांच्या कॅनडा , ऑस्ट्रेलिया येथील अपसंपदेची सीबीआय मार्फत चौकशी करावी, यातून सत्य ते सगळे बाहेरील येईल, असेही शेख यांनी म्हटले आहे.

## श्रीरामपुरातून यावर्षी मक्का, मदिना येथे जाणार ९५ हज यात्रेकरू



**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

यावर्षी ५ ते ९ जून दरम्यान होणाऱ्या हज यात्रेसाठी हज कमिटी मार्फत शहर व तालुक्यातील ९५ हज यात्रेकरू या महिन्यात जाणार असून खाजगी टूर कंपनीने जाणारे काही जण अद्याप प्रतिक्षेत आहेत. त्यांना विसा मिळाल्यास ही संख्या शंभरी पार जाणार आहे. भारत सरकारच्या हज कमिटी मार्फत यावर्षी १,२२,५१८ हज यात्रेकरू जाणार असून महाराष्ट्रातून साडेसात हजार तर नगर जिल्ह्यातून ६५० यात्रेकरू जाणार आहेत. संगमनेर मधून १५० जण हज यात्रेस जाणार आहेत. त्यांना नासिरखान साहेबखान पठाण व त्यांचे सहकारी यांचे मार्गदर्शन मिळत आहे. नगर जिल्ह्यातील बहुतांश यात्रेकरू शुक्रवार २३ मे रोजी सकाळी ५.५५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ मुंबई येथून सौदी अरेबियाच्या विमानाने रवाना होणार आहेत. ४४२ यात्रेकरू एकाच विमानातून जाणार आहेत. ३० एप्रिल रोजी नेवासा येथील १७ यात्रेकरू मक्का येथे पोहोचले आहेत तर २७ मे व ३१ मे ला नगर येथून उर्वरित लोक जाणार आहेत. यावर्षी श्रीरामपुरातून शिक्षक बँकेचे माजी चेअरमन व ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण, उद्योजक लतीफ करीम सय्यद, माजी नगरसेवक शेख सलीम पीरमोहम्मद, कोर्टातील नाझर रियाज अब्दूल पठाण, अजमत फातिमा शाळेचे सचिव मतीन इब्राहिम शेख, माजी मुख्याध्यापक फारूक शाह, रयत शिक्षण संस्थेतील माजी शिक्षक बेगू छोटू पटेल तसेच फिरोज रज्जाक तांबोळी, समीर रमजान पठाण, इकबाल युसुफ कुरेशी, रामगडचे शकील हारून सय्यद, करीम हसन पटेल, बशीर सय्यद, परवेज बशीर शेख, गफूर अब्बास पठाण, रफिक अब्दुल शेख, लियाकत बनेमिया, इसाक बाबूलाल इनामदार, युनूस खाटीक, इस्माईल अत्तार, रफिक मेमन, जमील खाटीक, वसीम सदाबडे, सिराज अहमद शेख, अब्दुल रहमान शेख आदींसह त्यांचे कुटुंबीयांचा समावेश आहे. श्रीरामपूर हज कमिटीचे प्रमुख सोहेल दारूवाला, जाकीर कुरेशी,दानिश पठाण, मुजम्मिल शेख,निसार शेख,मोहसीन कुरेशी व त्यांचे सर्व सहकारी हे हज यात्रेकरूंना सर्व प्रकारचे सहकार्य करीत आहेत. सध्या ठीक ठिकाणी या यात्रेकरूंना निरोप देण्याचे कार्यक्रम होत असून या यात्रेकरूंनी मक्का व मदिना येथे समस्त मानवतेसाठी तसेच देशासाठी प्रार्थना करावी असे आवाहन मानवता संदेश फाउंडेशन तर्फे करण्यात आले आहे.